2024 VII 27 - 1100

२०२४ . ०७ . २७ - ११००

N 427

Seat No.
बैठक क्र.

Time : 2 Hours **SOCIAL SCIENCES (73) HISTORY & POLITICAL SCIENCE—PAPER–I (M)**

वेळ - २ तास **सामाजिक शास्त्रे (७३) इतिहास व राज्यशास्त्र—पेपर-१ (म)**

(REVISED COURSE)

Pages - 11 **Total Marks : 40**

पृष्ठे - ११ **एकूण गुण - ४०**

सूचना :— (1) *सर्व* कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र विषयांवरील आहेत.

(4) प्रश्न क्रमांक 1(अ) आणि 6 मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

(5) प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील दिलेली संकल्पनाचित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(6) प्रश्न 1ला (अ), (ब) व प्रश्न 6वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

P.T.O.

1. (अ) **दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** 3

(1) आधुनिक इतिहासलेखनाचा जनक .... यास म्हणता येईल.

(अ) व्हॉल्टेअर

(ब) रेने देकार्त

(क) लिओपॉल्ड रांके

(ड) कार्ल मार्क्स

(2) मथूरा शिल्पशैली .... काळात उदयास आली.

(अ) कुशाण

(ब) गुप्त

(क) राष्ट्रकूट

(ड) मौर्य

(3) कोलकाता येथील .... हे भारतातील पहिले संग्रहालय होय.

(अ) गव्हर्न्मेंट म्यूझियम

(ब) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय

(क) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय

(ड) भारतीय संग्रहालय

(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा : 3

(1)	*(i)*	रेने देकार्त	–	डिस्कोर्स ऑन द मेथड
	(ii)	कार्ल मार्क्स	–	दास कॅपिटल
	(iii)	जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल	–	रिझन इन हिस्टरी
	(iv)	लिओपॉल्ड व्हॉन रांके	–	द हिस्टरीज्
(2)	*(i)*	माथेरान	–	थंड हवेचे ठिकाण
	(ii)	ताडोबा	–	लेणी
	(iii)	कोल्हापूर	–	देवस्थान
	(iv)	अजिंठा	–	जागतिक वारसास्थळ
(3)	*(i)*	मल्लखांब	–	शारीरिक कसरतीचे खेळ
	(ii)	वॉटर पोलो	–	पाण्यातील खेळ
	(iii)	स्केटींग	–	साहसी खेळ
	(iv)	बुद्धिबळ	–	मैदानी खेळ

4/N 427

2. (अ) **सूचनेप्रमाणे कृती पूर्ण करा (कोणतेही** *दोन*) **:** **4**

(1) संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(2) खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(3) पुढील तक्ता पूर्ण करा :

	भजन	भारूड
गुणवैशिष्ट्ये	....	....
उदाहरणे	....	....

(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही *दोन*) : **4**

(1) कला

(2) वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य संग्रामातील कार्य

(3) शब्दकोश.

3. **पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) :** 4

(1) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

(2) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

(3) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

(4) विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

4. **दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा :** 4

महाराष्ट्रातील बाराव्या-तेराव्या शतकातील मंदिरांना 'हेमाडपंती' मंदिरे असे म्हणतात. हेमाडपंती मंदिराच्या बाह्य भिंती बऱ्याचदा तारकाकृती असतात. तारकाकृती मंदिराच्या बांधणीत मंदिराची बाह्य भिंत अनेक कोनांमध्ये विभागली जाते. त्यामुळे त्या भिंती आणि त्यावरील शिल्पे यांच्यावर छायाप्रकाशाचा सुंदर परिणाम पाहण्यास मिळतो. हेमाडपंती मंदिरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे भिंतीचे दगड सांधण्यासाठी चुना वापरलेला नसतो. दगडांमध्येच एकमेकांत घट्ट बसतील अशा कातलेल्या खोबणी आणि कुसू यांच्या आधाराने भिंत उभारली जाते. मुंबईजवळील अंबरनाथ येथील अंब्रेश्वर, नाशिकजवळचे सिन्नर येथील गोंदेश्वर, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ

ही हेमाडपंती मंदिराची उत्तम उदाहरणे आहेत. त्यांची बांधणी तारकाकृती प्रकारची आहे. त्याखेरीज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हेमाडपंती मंदिरे पहावयास मिळतात.

प्रश्न :

(1) हेमाडपंती मंदिराच्या बाह्य भिंती कशा असतात ? 1

(2) हेमाडपंती मंदिराची उदाहरणे लिहा. 1

(3) हेमाडपंती मंदिराची महत्त्वाची वैशिष्ट्ये कोणती ? 2

5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) : 6

(1) कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धान्त स्पष्ट करा.

(2) उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा सहसंबंध असतो ?

(3) खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

(4) भारतीय चित्रपटसृष्टीची जननी अशी महाराष्ट्राची ख्याती का आहे ? ते उदाहरणासह स्पष्ट करा.

6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : **2**

(1) निवडणूक आयुक्ताची नेमणूक .... करतात.

(अ) राष्ट्रपती

(ब) प्रधानमंत्री

(क) लोकसभा अध्यक्ष

(ड) उपराष्ट्रपती

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी .... करण्यात आली.

(अ) जलक्रांती

(ब) हरितक्रांती

(क) औद्योगिकक्रांती

(ड) धवलक्रांती

7. **पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही *दोन*) :** **4**

(1) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

(2) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते.

(3) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.

8. **(अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही *एक*) :** **2**

(1) राखीव जागाविषयक धोरण

(2) प्रादेशिक पक्ष.

(ब) दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती पूर्ण करा (कोणतेही एक) : **2**

(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



9. पुढील प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा (कोणतेही एक) : 2

(1) मतदाराचे वय 21 वरून 18 वर्ष केल्यामुळे कोणते परिणाम झाले ?

(2) राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्यामुळे कोणते परिणाम होतात ?